सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात सातारा सैनिक शाळेला योजनेतर (वेतनेतर) अनुदानासाठी निधी वितरणास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः सासैशा-२०१७/प्र.क्र.१७३/एसएम-६
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई ३२
तारीख: २८ मार्च, २०१८

वाचा :-

१) शासन परिपत्रक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई क्रमांक अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८.४.२०१७
२) शासन परिपत्रक क्रमांकः पूरक २०१६/प्र.क्र.९९/ अर्थसंकल्प-३ , वित्त विभाग, दिनांक ३०.६.२०१७
३) शासन निर्णय क्रमांक सासैशा-२०१७/प्र.क्र.१७३/एसएम-६, शालेय शिक्षण विभाग, दिनांक १८.१०.२०१७
४) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे यांचे क्र. सासैशा-२०१७- १८/टे-३०३/११०४, दिनांक २०.२.२०१८
५) शासन निर्णय क्रमांक अनुवि-४९१७/प्र.क्र. ३२/अर्थसंकल्प, शालेय शिक्षण विभाग, दिनांक २१.०२.२०१८
६) शासन निर्णय क्रमांक सासैशा-२०१७/प्र.क्र.१७३/एसएम-६, शालेय शिक्षण विभाग, दिनांक २३.०३.२०१८

प्रस्तावना :-

सातारा सैनिकी शाळेची स्थापना दि. २३ जून १९६१ रोजी झाली असून सदर शाळा ही देशातील पहिली सैनिकी शाळा आहे. महाराष्ट्रातील तळागळातील व सर्व स्तरावरील गरीब व होतकरू मुलांना राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या माध्यमातून भारतातून सैन्य दलात अधिकारी पदावर संधी मिळावी, हा या शाळेचा मुख्य उद्देश आहे. या शाळेतून मोठया प्रमाणावर विद्यार्थी राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीमध्ये आतापर्यंत भरती झाले आहेत.

सातारा सैनिक शाळेला प्रतिवर्षी इमारत देखभाल, आहारभत्ता, घोडा देखभाल, जाहिरात खर्च, नगरपालिका कर या प्रयोजनार्थ योजनेतर (वेतनेतर) अनुदान मंजूर करण्यात येते. सातारा सैनिक शाळेला प्रशिक्षण व व्यवस्थापन खर्च, घोडादेखभाल खर्च, जाहिरात खर्च व नगरपालिका कर या बाबींवर खर्च करण्यासाठी लागणाऱ्या एकूण निधीच्या ७० टक्के निधी शासन निर्णय दि. १८.१०.२०१७ अन्वये वितरीत केला असून २०% टक्के निधी रु. २२,१९,४८९/-(रुपये बावीस लाख एकोणतीस हजार चारशे एकोणनव्वद फक्त) इतका निधी दि.२३.३.२०१८ च्या शासन निर्णयान्वये वितरीत केला आहे. सातारा सैनिक शाळेला प्रशिक्षण व व्यवस्थापन खर्च, घोडादेखभाल खर्च, जाहिरात खर्च व नगरपालिका कर या बाबींवरील खर्चासाठी उर्वरित १०% निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी रु.६८३४८.००० हजार इतकी अर्थसंकल्पीय तरतूद असून त्यापैकी ५९७१३.२०० हजार इतका निधी वितरीत केला आहे. उपलब्ध तरतूदीतून खालील बाबींकरिता आवश्यक असलेल्या रु. १,१०,९७,४४३/- निधीपैकी उर्वरित १०% म्हणजेच रु.११,०९,७४४/-(रुपये अकरा लाख नऊ हजार सातशे चव्वेचाळीस फक्त) इतका निधी सातारा सैनिकी शाळेला खालील बाबींवरील खर्चासाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात वितरीत करण्यास शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

अ.क्र.	खर्चाची बाब	सन २०१७-१८ मध्ये आवश्यक निधी (रुपये)	निधीच्या ७०% वितरीत केलेला निधी (रुपये)	निधीच्या २०% वितरीत केलेला निधी (रुपये)	निधीच्या १०% वितरीत करावयाचा निधी (रुपये)
१	प्रशिक्षण व व्यवस्थापकीय खर्च	८१,४९,०००	५७,०४,३००	१६,२९,८००	८,१४,९००
२	घोडा देखभालीसाठी	२३,३२,०००	१६,३२,४००	४,६६,४००	२,३३,२००
३	जाहिरात खर्चासाठी	३,८०,३०४	२,६६,२१३	७६,०६१	३८,०३०
४	नगरपालिका करासाठी	२,३६,१३९ ,	१,६५,२९७	४७२२८	२३,६१४
	एकूण	**१,१०,९७,४४३**	**७७,६८,२१०**	**२२,१९,४८९**	**११,०९,७४४**

२. सदर खर्च "मागणी क्रमांक ई-२, २२०२-सर्वसाधारण शिक्षण, ०२ माध्यमिक शिक्षण-११०, अशासकीय माध्यमिक शाळांना सहाय्य (००) (०३) पूर्वाध्ययन सैनिकी शाळांना सहायक अनुदान (२२०२०४६९), ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर)"या लेखाशिर्षातून भागविण्यात यावा.

३. सदर निधी वितरीत करण्यासाठी आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रक अधिकारी म्हणून तसेच सहायक संचालक (लेखा) माध्यमिक व उच्च माध्यमिक, शिक्षण संचालनालय, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. वित्त विभागाने निर्गमित केलेल्या विविध मार्गदर्शक सूचनांचे, वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८.४.२०१७ व क्रमांक अर्थसं-२०१७/प्र.क्र. ९४/अर्थ-३, दिनांक ३०.६.२०१७ च्या परिपत्रकातील आदेशांचे काटेकोर पालन करणे आवश्यक राहील.

५. सदर आदेश वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्र. (४) येथील शासन परिपत्रक, दिनांक ३०.६.२०१७ व शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, दिनांक २१.२.२०१८ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०३२८२००६५२०१२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sangita Dinesh Shelke

Digitally signed by Sangita Dinesh Shelke
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9ace0ca0b129ab4da8f9e911057d75e7fbf6f6bd0b55e8ff7ca0deacfa15e1c0, cn=Sangita Dinesh Shelke
Date: 2018.03.28 20:07:59 +05'30'

(संगिता दि. शेळके)
कार्यासन अधिकारी , महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव
२. प्रधान सचिव, (शालेय शिक्षण)मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक
३. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे
४. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे

५. सहायक संचालक (लेखा), माध्यमिक व उच्च माध्यमिक, शिक्षण संचालनालय, पुणे
६. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, सातारा.
७. महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई
८. प्रधान महालेखापाल(लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई
९. जिल्हा कोषागार अधिकारी, सातारा.
१०.वरीष्ठ कोषागार अधिकारी, पुणे.
११.प्राचार्य, सैनिकी स्कूल, सातारा
१२.सचिव, संरक्षण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.
१३.मानद सचिव, बोर्ड ऑफ गव्हर्नस सैनिकी स्कूल, नवी दिल्ली.
१४.कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५.वित्त विभाग,व्यय-५/अर्थसंकल्प-३ मंत्रालय,मुंबई-३२
१६.निवड नस्ती (एसएम-६)